—: प्रेस नोट :— दिनांक : ०४.०२.२०२०

| | |
|---|---|
| अे. सी. बी. | अॅन्टी करप्शन ब्युरो, अमरावती. |
| आरोपी लोकसेवकाचे नाव व कार्यालय | श्री.शरद शेषरावजी मोहोड, वय ४२ वर्ष, पद — जिल्हा परीषद सदस्य, नेरपिंगळाई सर्कल ता. मोर्शी जि.अमरावती. |
| मागणी केलेली लाचेची रक्कम | ५०,०००/— रूपये. |
| स्विकारलेली लाचेची रक्कम | ५०,०००/— रू. मधील पहीला टप्पा २०,०००/— रूपये त्यामध्ये १०,०००/— रू. चलनी नोटा व १०,०००/— रू.च्या डमी नोटा. |
| घटनास्थळ | आरोग्य विभाग कार्यालया समोर जिल्हा परीषद परीसर अमरावती |
| घटना तारीख व वेळ | ०४/०२/२०२० चे अं. १५.०० वा चे दरम्यान |

**थोडक्यात माहिती :—** यातील तक्रारदार हे शिक्षण संस्था सचिव असुन त्यांनी वस्तीगृहाचे सन २०१९ — २०२० मध्ये शासनाकडुन मिळणा—या अनुदानाकरीता प्रस्ताव सादर केला असता अनुदान व कर्मचारी यांचे मानधन मिळुन देण्याकरीता जिल्हा परीषद सदस्य श्री.शरद मोहोड यांनी ५०,०००/— रूपये लाचेची मागणी केल्याबाबत तक्रार प्राप्त झाली होती. सदर तक्रारीची दि. ०४/०२/२०२० रोजी पंचासमक्ष पडताळणी केली असता जिल्हा परीषद सदस्य श्री.शरद मोहोड यांनी तक्रारदार यांना अनुदान व कर्मचारी यांचे मानधन मिळुण देण्याकरीता ५०,०००/— रूपये लाचेची मागणी करून पहीला टप्पा २०,०००/— रू. स्विकारण्याचे मान्य केले व सापळा कारवाई दरम्यान पंचासमक्ष आरोग्य विभाग कार्यालय समोर जिल्हा परीषद परीसर अमरावती येथे तक्रारदार यांचे कडुन श्री. शरद मोहोड, जि.प. सदस्य यांनी एकुण २०,०००/— रूपये ज्यामध्ये १०,०००/— रूपयाच्या चलनी नोटा व १०,०००/— रूपयाच्या डमी नोटा स्विकारल्याने त्यांना रंगेहाथ पकडण्यात आले व गुन्हा दाखल करण्याची कारवाई सुरु आहे.

सदरची कारवाई पोलीस अधिक्षक अॅन्टी करप्शन ब्युरो, अमरावती परीक्षेत्र, अमरावती श्री. श्रीकांत धिवरे, अपर पोलीस अधीक्षक श्री. पंजाबराव डोंगरदिवे, व पोलीस उप अधीक्षक, घटक प्रमुख श्री.गजानन पडघन यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक श्री.संतोष शेंगावकर, श्री.राहुल तसरे व पो.कर्मचारी प्रमोद धानोरकर, विनोद कुंजाम, आशीष जांभोळे, व चालक अकबर हुसैन यांनी पार पाडली.

अॅन्टी करप्शन ब्युरो, अमरावती विभागातर्फे नागरीकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारासंबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागणा—या लोकसेवकाबद्दल तक्रार असल्यास अॅन्टी करप्शन ब्युरो, अमरावती विभागाशी संपर्क साधावा.

संपर्क :— अॅन्टी करप्शन ब्युरो, ललित सेंटर, परांजपे कॉलनी, कॅम्प, अमरावती.
टोल फ्री नंबर — १०६४ दुरध्वनी क्रमांक — ०७२१—२५५२३५५, २५५३०५५.

(संतोष बी. शेगांवकर)
पोलीस निरिक्षक
अॅन्टी करप्शन ब्युरो,अमरावती.
मो.क्र.८८०५१६३१००

Scanned by CamScanner